नोंदणी क्र. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक
# यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - ३५७ Issue - 357 | वार बुधवार दि. २० मे २०२६ Blow- Wednesday Date 20 May 2026 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

# नॉन क्रिमीलेअर मर्यादा १५ लाख करण्याची ओबीसी उपसमितीची शिफारस

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक होणार; ४३ नव्या जातींच्या समावेशासाठी केंद्राकडे जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : नॉन क्रिमीलेअरची मर्यादा आठहून १५ लाखांपर्यंत करण्याच्या ओबीसी मंत्रिमंडळ उपसमितीच्या शिफारशीबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत बैठक घेऊ असे निर्देश उपसमितीचे अध्यक्ष व महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

या शिफारशीसह केंद्र शासनाच्या इतर मागास प्रवर्गाच्या यादीत समाविष्ट नसलेल्या ४३ जातीचा प्रस्ताव राष्ट्रीय मागासवर्ग आयोगास सादर करण्यात आल्याची माहितीही देण्यात आली. महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी मंत्रालयात ओबीसी मंत्रिमंडळ उपसमिती बैठक पार पडली. अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, वनमंत्री गणेश नाईक, पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, इतर मागास बहुजन कल्याण व दुग्धविकास मंत्री अतुल सावे आणि विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बैठकीत विविध तांत्रिक व धोरणात्मक विषयांचा आढावा घेण्यात आला. यामध्ये उच्च न्यायालयाच्या निर्णयानुसार जात पडताळणी समितीकडील प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करणे, ओबीसी विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सवलती आणि विविध महामंडळांच्या नियुक्त्यांचा प्रश्न अग्रक्रमाने सोडविणे, राज्य मागासवर्ग आयोगाचे बळकटीकरण, उपसंचालक, सहाय्यक संचालक यांना वाहन घेण्यास मंजूरी, सध्या शिबिरांचे आयोजन करुन त्या माध्यमातून जात प्रमाणपत्रांचे वाटप सुरू असून, जिल्हाधिकाऱ्याशी बैठक घेऊन योग्य आणि पात्र व्यक्तींनाच प्रमाणपत्र दिले जावे अशी शिफारस करणे तसेच चुकीच्या लोकांना प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात येऊ नये असे आदेश देण्यात यावेत. अशा सूचनाही यावेळी करण्याची शिफारस करण्यात आली. वसतिगृह आणि कार्यालयांसाठी १० जिल्ह्यांमध्ये जागा उपलब्ध करण्यासाठी पुढील आठवड्यात जिल्हाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात येईल असे, बावनकुळे यांनी सांगितले.बैठकीसाठी विशेष उपस्थित लक्ष्मण हाके यांनी प्रशासकीय त्रुटींकडे लक्ष वेधले. स्पेलिंग मिस्टेकमुळे राज्यातील २७ ते ३२ जाती शासकीय लाभांपासून वंचित आहेत, यावर केंद्र सरकारला प्रस्ताव पाठवून तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी केली.



# पंढरपूर मंदिर परिसरातील महिला स्वच्छतागृहात चोरून चित्रीकरणाचा प्रयत्न, सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



सोलापूर : अधिक मास सुरू झाल्याने देशभरातून हजारो भाविक विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी पंढरपूरमध्ये दाखल होत आहेत. या भाविकांमध्ये मोठ्या संख्येने महिला आणि तरुणींचा समावेश आहे. त्याचवेळी मंदिर परिसरातील महिला स्वच्छतागृहात मोबाईलवर चोरून चित्रीकरण करण्याचा प्रयत्न झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकारामुळे महिला सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

दोनच दिवसांपूर्वी अशाच स्वरूपाची घटना घडली होती आणि त्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा अशाच प्रकारची घटना समोर आल्याने पोलीस, मंदिर प्रशासन आणि नगरपालिका प्रशासनाच्या सुरक्षाव्यवस्थेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

एक महिला स्वच्छतागृहात गेली असता तिने एका तरुणाला भिंतीवर चढून मोबाईलद्वारे चित्रीकरण करण्याचा प्रयत्न करताना पाहिले. संबंधित महिलेनं आरडाओरड केल्यानंतर तो तरुण घटनास्थळावरून पळून गेला. त्यानंतर स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना बोलावून या प्रकाराची माहिती देण्यात आली. या स्वच्छतागृहांचा वापर देशभरातून येणाऱ्या महिला भाविक आणि पर्यटकांकडून केला जातो. अशा ठिकाणी चोरून चित्रीकरणाचे प्रकार घडू लागल्याने महिला आणि लहान मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न अधिक गंभीर बनला आहे. संबंधित महिलांनी परिसरात काही तरुण अमली पदार्थ आणि मद्याचे सेवन करून वावरत असल्याचाही आरोप केला आहे. मंदिर परिसरात गंध लावण्याचे काम करणाऱ्या काही तरुणांपैकीच एखादा या घटनेत सहभागी असू शकतो, अशी शंका संबंधित महिलेनं व्यक्त केली आहे. त्यामुळे प्रशासनाने या सर्वांची चौकशी करून जबाबदाऱ्या निश्चित करण्याची मागणी होत आहे.

या गंभीर प्रकारानंतर सामाजिक कार्यकर्ते विक्रम शिरसाट यांनी प्रशासनाला इशारा दिला आहे. महिला भाविकांच्या सुरक्षेसाठी तातडीने उपाययोजना न केल्यास मोठे आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा त्यांनी दिला आहे.

काही दिवसांपूर्वी पंढरपुरात असाच प्रकार घडला होता. भाविकांच्या सोयीसाठी उभारण्यात आलेल्या दर्शन मंडपातील स्वच्छतागृहात चक्क दारूच्या बाटल्या, सिगारेटची पाकिटे आणि गुटखा-मावाच्या पुड्या आढळून आल्या होत्या. त्यानंतर आता महिलांच्या सुरक्षेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.


# अन्न आणि औषध प्रशासनाच्या आयुक्तपदी तुकाराम मुंढे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आपल्या कामाच्या धडाडीमुळे सातत्याने चर्चेत असलेले आणि सातत्याने बदलीचा त्रास सहन करणाऱ्या तुकाराम मुंढे यांची (ढींज्ञरीरा चींपवहश) पुन्हा एकदा बदली करण्यात आली आहे. लाचखोरी आणि इतर भ्रष्ट कामांमुळे चर्चेत असलेल्या अन्न आणि औषध प्रशासनात आता आयुक्त म्हणून तुकाराम मुंढेंची बदली करण्यात आली आहे. तसा आदेश राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने जारी केला आहे.

दीडच महिन्यांपूर्वी तुकाराम मुंढे यांची दिव्यांग विभागातून राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन, पुनर्वसन व मदत कार्य विभागात बदली करण्यात आली होती. आता पुन्हा त्यांची अन्न आणि औषध प्रशासन खात्यात आयुक्त म्हणून बदली करण्यात आली आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्याचं अन्न आणि औषध प्रशासन खातं सातत्याने चर्चेत आहे.



या विभागातल्या अधिकाऱ्यांवर सातत्याने भ्रष्टाचाराचे आरोप होताना दिसतात. राष्ट्रवादीचे नेते नरहरी झिरवाळ हे या खात्याचे मंत्री आहेत. काही दिवसांपूर्वी या विभागातील अधिकाऱ्याने मंत्रायलातच लाच घेतल्याचा प्रकार घडला होता. लाचलुचपत विभागाने मंत्रालयातच त्याला अटक करत कारवाई केली होती. अन्न आणि औषध प्रशासन खात्यावर सत्ताधारी भाजपचे आमदारही नाराज असल्याचं दिसून येतंय. अनेकदा तक्रारी करूनही या विभागाकडून कोणतीही कारवाई केली जात नाही असा तक्रारीचा सूरही त्यांनी गेल्या वेळच्या अधिवेशनामध्ये मांडला होता. त्याचवेळी या विभागातील अनेक अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट कारभार मात्र सुरूच असल्याची दबक्या आवाजात चर्चा असते. आपल्या शिस्तप्रिय आणि धडाकेबाज कामासाठी प्रसिद्ध असलेले तुकाराम मुंढे आता या खात्याचे नवे आयुक्त असणार आहेत. या आधी तुकाराम मुंढे यांनी दिव्यांग कल्याण विभागात आयुक्त म्हणून काम करताना मोठी कारवाई केली होती. बोगस दिव्यांग प्रमाणपत्र मिळवून सरकारी नोकरी मिळवलेल्या शेकडो कर्मचाऱ्यांवर त्यांनी निलंबनाची कारवाई केली होती. तुकाराम मुंढेंची ही साफसफाईची कामं सुरू असतानाच त्यांची बदली करण्यात आली. ३१ मार्च रोजी त्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आणि दिव्यांग विभागातील बोगस अधिकाऱ्यांवरची कारवाईही थांबली. त्यानंतर मुंढे यांची राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन आणि पुनर्वसन मदत कार्य विभागात बदली करण्यात आली. या बदलीला दीड महिनेही उलटून जात नाहीत तोपर्यंत आता पुन्हा एकदा त्यांच्या बदलीचे आदेश जारी करण्यात आले आहेत. प्रशासनात काम करताना नियमांवर बोट ठेवून काम करणारे तुकाराम मुंढे हे कोणत्याही सत्ताधाऱ्यांना पंसत नसल्याचं दिसून येतंय. राजकीय नेतृत्वाला, मंत्र्यांना आपल्या मनाप्रमाणे नियमबाह्य गोष्टी करण्यामध्ये तुकाराम मुंढे यांच्यासारखे अधिकारी अडथळे ठरतात. त्यामुळे नियमानुसार सर्वसाधारणपणे तीन वर्षात बदली होणे अपेक्षित असताना तुकाराम मुंढे मात्र सरासरी एक वर्षही काम करू शकत नाहीत. तुकाराम मुंढे हे २००५ बॅचचे अधिकारी असून गेल्या २१ वर्षांच्या कालावधीत त्यांची ही २५ वी बदली असल्याचं सांगण्यात येत आहे. प्रशासनात काम करताना हा एक वेगळ्या प्रकारे विक्रमच असल्याचं दिसून येतंय.

### राज्य शासनाचा अणुऊर्जा निर्मितीसाठी कंपन्यांशी सामंजस्य करार

# देशाला ‘संपन्न ऊर्जा’ राष्ट्र बनविण्यासाठी महाराष्ट्राचे बळ मिळणार : मुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाहीही यावेळी मुख्यमंत्र्यांनी दिली.

मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले.

यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. बैठकीला पारंपारिक ऊर्जा मंत्री अतुल सावे, ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला, एनटीपीसी लिमिटेडचे मुख्य महाव्यवस्थापक ए. पी. सामल, अदानी पॉवर कंपनीचे बिझनेस हेड



विवेक शर्मा, रिलायन्स इंडस्ट्रीजच्या न्यूक्लिअर एनर्जी बिजनेसचे अध्यक्ष रंजय शरण आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे.

ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे.

**२५, ४०० मेगावॅट अणुऊर्जा व १,२३,५०० रोजगार निर्मिती; एकूण गुंतवणूक ६,५०,००० कोटी**

कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल, असेही मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले.

याप्रसंगी ऊर्जा विभागाच्या अपर मुख्य सचिव आभा शुक्ला व कंपन्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांमध्ये करारांचे आदान-प्रदान करण्यात आले.

करारामुळे होणारी अणुऊर्जा व रोजगार निर्मिती

अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे.

अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

# राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे, १६५२ वाड्यांमध्ये ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**




मुंबई : राज्यात वाढत्या उन्हाच्या तीव्रतेमुळे अनेक भागांमध्ये पाणीटंचाईची समस्याअसून नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी शासनाने विविध जिल्ह्यांत टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू ठेवला आहे.

दिनांक ११ मे ते १७ मे २०२६ दरम्यानच्या कालावधीतील अहवालनुसार राज्यातील १५ जिल्ह्यांतील ६३३ गावे आणि १६५२ वाड्यांमध्ये एकूण ७०६ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. या टँकरमध्ये ३३ शासकीय तर ६६९ खासगी टँकरचा समावेश आहे. वाढत्या तापमानामुळे विहिरी, बोअरवेल आणि लहान पाणीस्त्रोत कोरडे पडू लागल्याने अनेक ग्रामीण भागांमध्ये टँकर हा नागरिकांसाठी पिण्याच्या पाण्याचा प्रमुख आधार ठरत आहे. ठाणे विभागात सर्वाधिक १७७ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १५५ टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. तर नाशिक विभागात १५६ गावे आणि ४४४ वाड्यांसाठी १५९ टँकर कार्यरत आहेत. पुणे विभागात १४५ गावे आणि ५७२ वाड्यांमध्ये १३१ टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू आहे.

छत्रपती संभाजीनगर विभागात १३८ गावे आणि ६४ वाड्यांसाठी एकूण २४४ टँकर कार्यरत असून राज्यातील सर्वाधिक टँकर या विभागात वापरण्यात येत आहेत. अमरावती विभागात १७ गावांसाठी १७ टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येत आहे. नागपूर विभागात सध्या कोणत्याही ठिकाणी टँकरची आवश्यकता भासलेली नाही.

राज्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा प्रशासन, ग्रामपंचायती आणि पाणीपुरवठा विभाग यांच्याकडून परिस्थितीवर सातत्याने लक्ष ठेवण्यात येत आहे. नागरिकांना नियमित आणि सुरक्षित पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असून टँकर पुरवठ्याबरोबरच पर्यायी जलस्रोतांचा वापर, विहिरींचे अधिग्रहण आणि जलसाठ्यांचे नियोजन यावरही भर दिला जात आहे.

आगामी काळात तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता लक्षात घेऊन प्रशासनाने पाणीटंचाईग्रस्त भागांमध्ये आवश्यकतेनुसार अतिरिक्त टँकर उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

## अग्रेसर महाराष्ट्र

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवून देशात शून्य कार्बन उत्सर्जन करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. या उद्दिष्ट पूर्तीसाठी महाराष्ट्र पुरेपूर प्रयत्न करीत आहे. स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात राज्यात येणारी गुंतवणूक ही देशाला संपन्न ऊर्जा राष्ट्र बनवण्यासाठी निश्चितच बळ देणारी ठरणार आहे, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. राज्यात अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये गुंतवणूक करण्यास इच्छुक असलेल्या कंपन्यांना शासनाच्यावतीने संपूर्ण सहकार्य करण्यात येणार आहे. मंत्रालयात आयोजित बैठकीत अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रामध्ये राज्य शासनासोबत चार कंपन्यांचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये एनटीपीसीएल (नॅशनल थर्मल पॉवर कॉर्पोरेशन लिमिटेड), अदानी पॉवर कंपनी, रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड, ललितपुर पावर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) यांचा समावेश आहे. राज्यामध्ये स्वच्छ ऊर्जा निर्मिती क्षेत्रात मोठ्या संधी आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये अणुऊर्जा ही अत्यंत महत्त्वाची आहे. या क्षेत्रात होत असलेल्या गुंतवणुकीतून राज्य ऊर्जा निर्मितीमध्ये अधिक वेगाने प्रगती करणार आहे. ही गुंतवणूक केवळ ऊर्जा निर्मितीसाठीच लाभाची नसून त्यामुळे रोजगाराच्या संधीही उपलब्ध होणार आहेत. स्वच्छ ऊर्जा निर्मितीमध्ये महाराष्ट्र नेहमी देशात अग्रेसर असणार आहे. कंपन्यांनी सामंजस्य करार प्रत्यक्ष अंमलबजावणीमध्ये आणण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. संबंधित कंपन्यांनी प्रकल्पाच्या जागांचे सर्वेक्षण करावे. या कामी राज्य शासनाचा संबंधित विभाग त्यांना सहकार्य करेल. अदानी पॉवर लिमिटेड कंपनी राज्यात १ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक करणार असून त्यातून ६ हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती होईल. तसेच प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या १२ हजार रोजगार निर्मिती अपेक्षित आहे. रिलायन्स इंडस्ट्रीज २ लाख कोटी रुपयांचीगुंतवणूक करणार आहे. यामधून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती व एक लाखाच्यावर रोजगार उपलब्ध होणार आहे. तसेच एनटीपीसी लिमिटेड १ लाख कोटींची गुंतवणूक करणार असून ७२०० मेगावॅट ऊर्जा निर्मिती अपेक्षित आहे. यामध्ये ५ हजार रोजगार निर्मिती होईल. ललितपुर पॉवर जनरेशन कंपनी लिमिटेड (बजाज उद्योग समूह) राज्यात २ लाख कोटींची गुंतवणूक करणार आहे. यामधून पाच हजार मेगावॅट ऊर्जा निर्मिती आणि ३ हजार रोजगार निर्मिती होणार आहे. अशाप्रकारे राज्यात एकूण ६ लाख ५० हजार कोटींची गुंतवणूक होणार असून २५ हजार ४०० मेगावॅट इतकी ऊर्जा निर्मिती आणि १ लाख २३ हजार ५०० रोजगार निर्मिती अपेक्षित आहे.

# गुन्ह्याला माफी नाही; विद्यार्थ्यांचे भविष्य मात्र टांगणीला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिवराज मोठे गावकर यांना अटक पंढरपूर अरेरे काय दिवस आलेत राव! ज्या हातांनी पोरांना केमिस्ट्रीचे फॉर्म्युले शिकवून डॉक्टर-इंजिनिअर बनवायचं स्वप्न दाखवलं, त्याच हातांत आज सीबीआयने कायद्याच्या बेड्या ठोकल्या. ज्या डोक्याने 'गोल्ड मेडल' जिंकलं, त्याच डोक्याने अख्ख्या शिक्षण व्यवस्थेचा बाजार मांडला. शिवराज मोटेगावकर! लातूर पॅटर्नचा स्वतःला ब्रँड म्हणवून घेणारा, १ हजार कोटींच्या साम्राज्यावर सुबत्ता भोगणारा हा माणूस आज मान खाली घालून पोलिसांच्या गाडीत बसलाय. पण राग या गोष्टीचा नाही की एक मोठा माणूस जेलमध्ये गेला; राग या गोष्टीचा आहे की, या असल्या धंदेवाईकांमुळे महाराष्ट्रातल्या लाखो गरीब, शेतकरी आणि कष्टकरी बापांच्या विश्वासाचा खून झालाय. गावाकडचा बाप जेव्हा आपली एक-दोन एकर जमीन गहाण ठेवतो, आईच्या गळ्यातलं मंगळसूत्र सोनाराकडं गहाण ठेवतो, तेव्हा कुठे या असल्या 'लातूरच्या कारखान्यांची' लाखो रुपयांची फी भरली जाते. पोराने डॉक्टर व्हावं, घराचं दारिद्र्य फिटावं म्हणून बाप तिथे उन्हातान्हात राबतोय आणि इकडे हे 'गुरुजी' नावाचे दलाल कोट्यवधी रुपयांचे बंगले बांधून, पेपर फुटीचे आणि घोटाळ्यांचे बाजार मांडून बसलेत! हा नुसता घोटाळा नाही, हा आमच्या पोरांच्या भविष्याचा मुडदा पाडणारा क्रूर खेळ आहे! माणूस शिकला की शहाणा होतो, असं आमची म्हातारी माणसं सांगायची. पण इथं तर उलटाच कारभार झाला. शिवराज मोटेगावकर हा काय ऐरागेरा माणूस नव्हता. एम.एस्सी. केमिस्ट्रीमध्ये सुवर्णपदक (Gold Medalist) विजेता, NET, SET, GTE सारख्या देशातल्या सर्वोच्च आणि अत्यंत कठीण मानल्या जाणाऱ्या परीक्षा पहिल्या फटक्यात उत्तीर्ण झालेला बुद्धीचा सम्राट! रसायनशास्त्राचा (Chemistry) असा शिक्षक, ज्याच्या एका शब्दावर हजारो पोरं लातूरला धाव घ्यायची. 'आरसीसी' (RCC) नावाचं एक मोठं साम्राज्य उभं केलं. पण विचार करा, ज्या बुद्धीचा वापर गरिबांच्या पोरांना वर आणण्यासाठी करायला पाहिजे होता, तीच बुद्धी या व्यवस्थेला वाळवीसारखी पोखरण्यासाठी कशी वापरली गेली? पुण्यातल्या पी. व्ही. कुलकर्णी चौकशीदरम्यान जेव्हा धागेदोरे हाती लागले, तेव्हा या 'माऊलीचा' खरा चेहरा समोर आला. सीबीआयच्या (CBI) २८ जणांच्या पथकाने जेव्हा लातूरच्या त्या आलिशान साम्राज्यावर छापा टाकला, तेव्हा ८ ते १० तास या महाशयांची घाम सुटेपर्यंत चौकशी झाली. अखेर, पापाचा घडा भरला आणि सीबीआयने मुसक्या आवळून गाडीत कोंबलं. अरे, लाज वाटायला पाहिजे! ज्या हातांनी सरस्वतीची पूजा करायची, पोरांना ज्ञान द्यायचं, त्याच हातांनी लक्ष्मीच्या हापापलेपणासाठी थेट पेपर फुटीच्या आणि सेटिंगच्या काळ्या बाजारात उडी घेतली? ज्ञान देणारा गुरुच जर व्यवस्थेला काळिमा फासायला लागला, तर मग या समाजाने विश्वास तरी कोणावर ठेवायचा?

लातूर पॅटर्न एक काळ असा होता जेव्हा या नावाचा दरारा होता. राज्यातली पोरं तिथे उन्हातान्हात, साध्या खोलीत राहून, वाटी-भातावर दिवस काढून अभ्यास करायची आणि मेरिटमध्ये यायची. पण या मोटगावकरांसारख्या व्यापाऱ्यांनी त्या पवित्र 'लातूर पॅटर्न'चा नुसता धंदा करून टाकला. फीच्या नावाखाली लूट: एका एका पोराची फी लाख-लाख, दोन-



दोन लाख रुपये! जर फी भरायला एक दिवस उशीर झाला, तर पोराला क्लासच्या बाहेर काढणारे हे लोक. हजार कोटींचं साम्राज्य: एका शिक्षकाकडे १ हजार कोटींची संपत्ती येते कुठून? एवढे मोठे बंगले, महागड्या गाड्या, जमिनी हा सगळा पैसा पोरांच्या आणि त्यांच्या पालकांच्या रक्ताचा आहे. शॉर्टकटचा धंदा: जेव्हा क्लास चालवूनही पोट भरत नाही, तेव्हा मग पेपर सेट करणाऱ्या यंत्रणेला हाताशी धरायचं, पैशाच्या जोरावर पेपर फोडायचे, आणि आपल्या क्लासची पोरं कशी टॉप येतात याचं मार्केटींग करायचं!

कसला पराक्रम? ही कसली बुद्धिमत्ता? हा तर सरळ-सरळ दरोडा आहे. तुम्ही प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या त्या गरिबाच्या पोराचा हक्क हिरावून घेतला, जो रात्र-रात्रभर कंदील लावून किंवा स्ट्रीट लाईटखाली अभ्यास करत होता. पैशाच्या जोरावर श्रीमंतांची ढब्बू पोरं डॉक्टर होणार आणि लायकी असूनही गरिबाचं पोरगं शेतात राबणार, ही कसली व्यवस्था तुम्ही आणू पाहत आहात?

गावाकडच्या एका साध्या बापाची व्यथा जरा डोळे उघडून बघा. उन्हाळ्यात अंगाची लाही-लाही होत असताना, पायात चप्पल नसताना तो शेतात नांगर धरतो. कशासाठी? तर लातूरला, पुण्यात शिकणाऱ्या आपल्या पोराला पैशाची कमी पडू नये म्हणून. महिना संपायच्या आत पोराच्या खात्यावर पैसे पाठवण्यासाठी हा बाप सावकाराचे पाय धरतो. आणि जेव्हा पोराचा रिझल्ट येतो, तेव्हा कळतं की परीक्षाच रद्द झाली किंवा पेपर फुटला! त्या बापाच्या काळजावर काय बेतत असेल, याचा विचार कधी केला का रे तुम्ही, पैशाचे पुतळे झालेल्यांनो? मोटेगावकर सारखे लोक जेव्हा अटक होतात, तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर पश्चात्तापाचा एक टक्काही भाव नसतो. कारण त्यांना माहीत असतं, पैसा फेको, तमाशा देखो. आज अटक झाली, उद्या जामीन होईल, पुन्हा महागड्या गाडीत फिरतील. पण ज्या पोरांचे वय निघून गेलं, ज्या पालकांचं आयुष्यभराचं भांडवल संपलं, त्यांचं काय? त्यांच्या आयुष्याची राखरांगोळी झाली, त्याला जबाबदार कोण?

शिवराज मोटेगावकर तर फक्त एक हिमनगाचं टोक आहे. या शिक्षण व्यवस्थेच्या नावाखाली अख्खा बाजार सडलाय. कोचिंग क्लासेसचे मालक आता शिक्षक राहिले नाहीत, ते माफिया झालेत. मंत्रालयातल्या अधिकाऱ्यांशी सेटिंग, परीक्षा घेणाऱ्या बोर्डाच्या माणसांना लाच, आणि राजकीय नेत्यांचे वरदहस्त! या तिन्हींच्या जोरावर हा काळा धंदा राजरोसपणे सुरू आहे. जोपर्यंत या एज्युकेशन माफियांच्या मुळावर घाव घातला जात नाही, तोपर्यंत महाराष्ट्रातल्या कोणत्याही परीक्षेची पवित्रता शिल्लक राहणार नाही. आज छएएढ असेल, उद्या SET-NET असेल, परवा स्पर्धा परीक्षा असतील प्रत्येक ठिकाणी हेच दलाल बसलेले आहेत.

माझा सवाल सरकारला आहे, तपास यंत्रणांना आहे आणि या समाजातल्या प्रत्येक बापाला आहे आम्ही कधीपर्यंत हे सहन करणार? सरकारला सवाल: हे असले हजार कोटींचे मालक जेव्हा शिक्षण व्यवस्थेला बाजारात विकतात, तेव्हा तुमची गुप्तहेर यंत्रणा काय झोपा काढत असते का? पी. व्ही. कुलकर्णींची चौकशी झाली नसती, तर हा मोटगावकरांचा काळा धंदा कधी समोर आलाच नसता का?

अजून किती दिवस या असल्या मोठ्या ब्रँडच्या नावाखाली आपल्या कष्टाचा पैसा यांच्या घशात घालणार आहात? जो शिक्षक स्वतः गुन्हेगार आहे, तो तुमच्या पोराला काय संस्कार देणार आणि काय डॉक्टर बनवणार? ज्ञान देणाऱ्या हातांनी जर व्यवस्थेलाच काळिमा फासला, तर समाजाने विश्वास कोणावर ठेवायचा? हा प्रश्न आज महाराष्ट्रातल्या प्रत्येक घरात विचारला गेला पाहिजे.

शिवराज मोटेगावकर, तुझी जी काय लायकी होती, ती कायद्याने आज दाखवून दिलीय. सोन्याचं पदक जिंकणारं तुझं ते डोकं जर पोरांच्या आयुष्याशी खेळायला लागलं, तर त्या सुवर्णपदकाची किंमत कवडीमोलाचीही उरत नाही. सीबीआयने या प्रकरणाचा असा तपास केला पाहिजे की, याच्या पाठीमागे जे कोणी बडे मासे, राजकारणी किंवा अधिकारी असतील, त्या सगळ्यांना खेचून बाहेर काढलं पाहिजे. या गुन्ह्याला माफी नाही. हा गुन्हा देशाच्या भविष्याशी, तरुणाईच्या रक्ताशी खेळणारा आहे.

आता तरी महाराष्ट्रातील शिक्षण व्यवस्थेचे शुद्धीकरण होणार का? की पुन्हा काही दिवसांनी नवीन मोटेगावकर जन्माला येणार? जनता बघतेय, आणि जनतेचा हा राग आता शांत बसणार नाही! तुडवून टाका अशा शिक्षण माफियांना, जे आमच्या पोरांच्या स्वप्नांची राख करत आहेत!

**- @गंगाधर गडदे**

# साथी पोर्टल: बियाण्यांच्या पारदर्शकता, गुणवत्ता व विश्वासार्हतेकडे डिजिटल पाऊल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आपल्या देशात बियाण्यांचा वापर फार मोठ्या प्रमाणावर होतो. विविध प्रकारचे तृणधान्ये, कडधान्ये, कापूस, सोयाबीन, भाजीपाला अशा प्रत्येक पिकांसाठी दरवर्षी प्रचंड प्रमाणावर बियाण्यांची देवाण-घेवाण होते. परंतु या मोठ्या व्यवहारामध्ये पारदर्शकतेचा अभाव होता. अनेकदा शेतकऱ्यांना कोणते बियाणे अधिकृत कंपनीचे आहे आणि कोणते बनावट आहे, कळण्यास अडचण निर्माण होत होती. बियाण्यांची पिशवी घेतल्यानंतर त्यामध्ये अपेक्षित गुणधर्म असतीलच याची हमी नसायची, परिणामी उत्पादन घटायचे व शेतकऱ्याचा खर्च वाया जायचा. शासनालाही बियाण्यांच्या उपलब्धतेची अचूक आकडेवारी मिळत नसे. एका जिल्ह्यात बियाण्यांचा तुटवडा असताना दुसऱ्या जिल्ह्यात साठा पडून राहायचा. या सगळ्या अडचणींवर उपाय म्हणून साथी पोर्टलची निर्मिती करण्यात आली.

शेतकऱ्यांना वेळेवर, गुणवत्तापूर्ण आणि खात्रीशीर बियाणे मिळणे हे अन्नसुरक्षेसाठी आणि कृषी उत्पादनक्षमतेसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. उत्तम गुणवत्तेच्या जनुकीयदृष्ट्या सुधारित बियाणांमुळे पीक उत्पादनात २० टक्क्यापर्यंत वाढ होऊ शकते.

परंतु बहुतेक वेळी बनावट, कालबाह्य आणि अनधिकृत बियाण्यांचा पुरवठा झाल्याने शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान होत असते. या समस्येवर कायमस्वरूपी उपाय म्हणून भारत सरकारच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाने राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्राच्या सहकार्याने डशशव ींहशपींळलरींळेप, ढीरलशरलळश्रळीं रपव केश्रळींळल खर्पींशर्पीं म्हणजेच साथी पोर्टल विकसित करण्यात आले आहे. या पोर्टलची अंमलबजावणी सन २०२३ पासून टप्प्याटप्प्याने करण्यात आली असून २५ एप्रिल २०२५ पासून सत्यप्रत बियाणे साथी पोर्टलवर कार्यान्वित करण्यास शासनाची मान्यता मिळाली आहे.

साथी पोर्टल केवळ माहिती व्यवस्थापनासाठी नसून शेतकऱ्यांपासून ते शासनापर्यंत सर्व घटकांना जोडणारे, पारदर्शकता वाढवणारे आणि बियाण्यांच्या गुणवत्तेचे रक्षण करणारे एक सशक्त व्यासपीठ आहे. साथी पोर्टल हे एक डिजिटल आरसा आहे, ज्यामध्ये बियाण्याचा प्रवास स्पष्टपणे दिसतो. हे पोर्टल बियाणांच्या संपूर्ण प्रवासाची नोंद ठेवते. साथी प्रणालीनिर्मित सांकेतांक क्रमांकामुळे (क्युआर कोड) बियाण्याच्या उत्पादनाचा स्वतंत्र इतिहास शेतकऱ्याला सहज तपासता येतो. यामुळे ट्रेसिबिलिटी, पारदर्शकता, गुणवत्ता नियंत्रण आणि कायदेशीर पालन सुनिश्चित होते. बियाणे उत्पादक व वितरकांसाठी साथी पोर्टलची उपयुक्तता : पारदर्शकता आणि शेतकऱ्यांमध्ये विश्वासार्हता वाढवते. बनावट, कालबाह्य व अनधिकृत बियाण्यांवर नियंत्रण ठेवणे, व्यवसाय सुलभता आणि व्यवस्थापन, कायदेशीर बाबींचे पालन करणे सुलभ, खर्चात व वेळेत बचत होण्यासह विक्री आणि वितरणावरील नियंत्रण, एकत्रित डेटा बँक तयार होते.

तसेच वितरण साखळीचा ट्रॅक ठेऊन नियोजन शक्य, शेतकऱ्यांच्या तक्रारींवर तात्काळ उपाययोजना शक्य, एकाच प्लॅटफॉर्मवर सर्व व्यवहार, राज्य व राष्ट्रीय स्तरावर नेटवर्किंग, संस्थेचा ब्रँड व व्यवसाय दोन्ही वाढण्यास मदत होते. बियाणे विक्रेत्यांनी https://seedtrace.gov.in/ या पोर्टलवर लॉगिन करावे. संकेतस्थळावर प्रवेश केल्यानंतर 'महाराष्ट्र राज्य' निवडावे. त्यानंतर लॉगिन आयडी व पासवर्ड प्रविष्ट करून, कॅप्चा कोड टाकावा व लॉगिन करावे.

प्रथमच लॉगिन केल्यानंतर वापरकर्त्यांनी सर्वप्रथम आपली प्रोफाईल अद्ययावत करावी. या पोर्टलवर खरेदीदारांचे विक्रेते, शासकीय संस्था आणि शेतकरी असे तीन प्रकार उपलब्ध आहेत. शेतकऱ्यांना बियाणे विक्री करतांना फार्मर आयडी नमूद करावा. फार्मर आयडी नमूद उपलब्ध नसल्यास शेतकऱ्याचे पूर्ण नाव व भ्रमणध्वनी क्रमांक नमूद करावा. त्यानंतर साठा निवड व बियाणे विक्रीसाठी विक्रेते, शासकीय संस्थेच्या बियाणे विक्री कार्यपद्धतीचा अवलंब करुन शेतकऱ्यांना बियाणे विक्री करावे.

राज्यातील बियाणे उत्पादक तसेच विक्रेत्यांच्या संघटनांचे (सियाम, मासा व माफदा) सूचनांनुसार साथी पोर्टलमध्ये आवश्यक तांत्रिक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. त्यामध्ये लॉट-निहाय ट्रॅकिंग प्रणालीची अंमलबजावणी, प्रत्येक बियाणे बॅग स्वतंत्र स्कॅन करण्याची आवश्यकता नसलेली सुलभ विक्री प्रक्रिया, ईआरपी प्रणाली (उदा. टॅली) सोबत एकत्रीकरण, ग्रीस्टॅक एपीआयद्वारे फार्मर आयडी आधारित माहितीची स्वयंचलित उपलब्धता, बाह्य सॉफ्टवेअर वापरणाऱ्यांसाठी बिलिंग प्रक्रिया अकार्यान्वित करण्याची सुविधा, डढक्कख-डरश्रशएरी मोबाईल ॲपद्वारे सुलभ विक्री नोंद, तसेच बियाणे (नियंत्रण) आदेश, १९८३ अंतर्गत फॉर्म ऊ सादरीकरणाची सुविधा यांचा समावेश आहे. याशिवाय, बियाणे साठा परतावा प्रक्रियेतही संघटनेच्या सहमतीनेच आवश्यक सुधारणा करण्यात आलेल्या आहेत. डॉ. प्रीती सवाईराम ,कृषी उपसंचालक (बियाणे ),कृषी आयुक्तालय: योग्य बियाणे - योग्य वेळी - योग्य शेतकऱ्यापर्यंत हे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी समन्वय, पारदर्शकता व तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक असून त्याद्वारे राज्यातील शेतकऱ्यांना गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध करून देत उत्पादनक्षमता वाढविणे शक्य होईल.

# बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकराईट विचारधारा ही आपल्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग आहे : बी. बी. मेश्राम

**फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनची १७१ वी शतकोत्तर मोफत वैचारिक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संपन्न**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



छत्रपती संभाजी नगर/ प्रतिनिधी : फुले शाहू आंबेडकराईट स्टडी फाउंडेशन व दि ऑल इंडिया नाग संघाच्या संयुक्त विद्यमाने आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होण्यासाठीच धमांतराची आवश्यकता आहे. या ऐतिहासिक, प्रासंगिक विषयावर १७१ वी शतकोत्तर मोफत वैचारीक प्रबोधनात्मक साप्ताहिक कार्यशाळा संस्थेचे कार्यालय, साकेत नगर, छत्रपती संभाजीनगर येथे १७ मे २०२६ ला संपन्न झाली.

फुले, शाहू, आंबेडकराईट स्टडी फाउंडेशनचे संचालक बी. बी. मेश्राम अध्यक्षीय मार्गदर्शन करताना म्हणाले की, समाज जीवनात शिक्षित, उच्च शिक्षित, अति उच्च शिक्षित, डॉक्टर, वकील, इंजिनियर यासह उच्चाधिकारी पहायला मिळत असले तरी सुशिक्षित माणसं शोधून सापडणे दुरापास्त झाले आहे. त्यामुळे ही लाभार्थी मंडळी समाजाची प्रतिकारशक्ती न होऊ शकल्याने अन्याय अत्याचार वाढत चालले आहेत. समाजात विद्वत्तप्रदान, चारित्र्यसंपन्न, प्रशिक्षित कार्यकर्ते निर्माण होण्यासाठी अभ्यासक्रमात बुद्ध फुले शाहू आंबेडकरवादाचा समावेश केला पाहिजे. तसेच जनतेला अपडेट आणि अपग्रेड करण्यासाठी सर्व पक्ष संघटना, संस्थांनी स्वतंत्रपणे वैचारिक प्रबोधनात्मक कार्यशाळा चालविल्या पाहिजेत. पक्ष, संघटन, संस्थाना चालविण्यासाठी लागणारे इंधन समाजाने उपलब्ध करून द्यावे, म्हणून समाजमन तयार केले पाहिजे. जेणेकरून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या अपेक्षेप्रमाणे समाजातील सर्व हितचिंतक आणि लाभार्थी आपल्या उत्पन्नाच्या सर्व स्त्रोतातील विसावा हिस्सा आनंदाने प्रदान करू शकतील. अर्थात केवळ हजार पाचशे रुपयाची पावती फाडणे नव्हे! तर अर्थसहाय्यासह दररोज किमान एक तास बारा मिनिटे म्हणजे आठवड्याला आठ तास चोवीस मिनिटे वेळ देऊन बुद्धिमत्तेचा कस लावला पाहिजे. कुठल्याही नेत्यांने वाईट केले असं जेव्हा लोक म्हणतात, तेव्हा त्यांनी त्या वाईट व्यक्तीला नेता म्हणून का स्वीकारावे? हा दोष नेतृत्वाचा, कार्यकर्त्यांचा की जनतेचा याची चिकित्सा होणे आवश्यक आहे. जेणेकरून बाबासाहेबांच्या अपेक्षेप्रमाणे नेतृत्वावर करडी नजर ठेवता येईल. ज्या काळात व्यवस्थेने अस्पृश्यांना विद्या, संपत्ती व शस्त्र नाकारले होते. त्यांना माणुसकीयुक्त जीवन जगता यावे म्हणून धर्मांतर करणे अगत्याचे झाले होते. ही निकड लक्षात घेऊन नंतरच्या काळात १४ ऑक्टोबर १९५६ ला डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी धर्मांतर केले आहे. तरी समाजात सामाजिक सलोखा कायम टिकविण्यासाठी धर्मांध शक्तींना रोखावे लागेल. करिता वैज्ञानिक मानवीय समाज निर्माण करण्यासाठी बुद्ध, फुले, शाहू, आंबेडकरांच्या विचारधारेला आपल्या जीवन जगण्याचा अविभाज्य भाग बनवावे लागेल. जेणेकरून आपल्या मातीमोल आयुष्याला सोन्याचे दिवस प्राप्त होऊ शकतील. याचे मर्म समाजाला कळावे म्हणून सदरील विषयावर जाणीवपूर्वक कार्यशाळेचे आयोजन केलेले आहे.

उद्घाटनपर मार्गदर्शन करताना नरवडे ग्लोबल ह्यूमन राइट्स असोसिएशनचे अध्यक्ष पांडुरंग नरवडे म्हणाले की, शासनकर्ती जमात होऊन आदर्शांचे स्वप्न साकार करण्यासाठी संघटितपणे प्रयत्न केले पाहिजेत. आपल्या अधिकाऱ्यांनी झोपडपट्टीत लाल दिव्याची गाडी फिरवली पाहिजे जेणेकरून आपल्या मुलांना प्रेरणा मिळेल. समाजातील प्रामाणिक कार्यकर्त्यांच्या बळावर चळवळी चालत असतात.

प्रमुख वक्ते म्हणून बोलताना ॲड. जी. एन. खंडागळे म्हणाले की, मातीमोल आयुष्य म्हणजे काय? मातीची किंमत तपासल्यावर सोन्याच्या दिवसाची किंमत कळते. माणूसच माणसाला माणूस म्हणून जगू देत नाही करिता, त्यांना गुलामगिरीची जाणीव करून दिली पाहिजे. आत्मसामानासाठी जात व्यवस्था नाकारून धर्मांतर केले पाहिजे. मानवाचा स्वाभिमान क्षमता जोपासण्यासाठी धमांतराची आवश्यकता आहे.

याप्रसंगी बोलताना सामाजिक कार्यकर्ते सुभाष ठोकळ म्हणाले की, सत्तेशिवाय तरणोपाय नाही करिता शासनकर्ती जमात होण्यासाठी संघटित होऊन राज्यसत्ता ताब्यात घेतली पाहिजे. प्रा. विलास कटारे म्हणाले की, माणुसकीहीन अवस्थेत खितपत पडलेल्या अस्पृश्यांना त्यातून बाहेर काढण्यासाठी बाबासाहेबांनी कार्य केले. सोहेल पटेल म्हणाले की, काळाराम मंदिर, चवदार तळे यासारखे सर्व आंदोलन बाबासाहेबांनी समतेसाठी केले होते. राहुल गायकवाड म्हणाले की, प्रस्थापित व्यवस्था समजून घेऊन आंदोलनाचा कारवाँ पुढे नेत राहिले पाहिजे. प्रा. शिवम गायकवाड म्हणाले की, हिंदू धर्मियांना सुधारण्याचे प्रयत्न निष्फळ ठरल्यावर पालथ्या घड्यावर पाणी टाकण्यात अर्थ नाही, असे समजून बाबासाहेबांनी धर्मांतराचा निर्णय घेतला. महेंद्र खिल्लारे म्हणाले की, गुलामगिरी नाहीशी करण्यासाठी धर्मांतर केले पाहिजे. ॲड. सुनील-कुमार नागवंश म्हणाले की, सर्व समाजाचा भार वाहण्याची क्षमता असणाऱ्यांना लीडर असं म्हणतात. राज गायकवाड म्हणाले की, अभ्यासक्रमात आंबेडकरवाद नाही, ही आपली खरी समस्या आहे. उद्योजक शशिकांत काळे म्हणाले की, आपापसात भांडणे हे आता योग्य नाही.

सुरुवातीला आदर्शांना पुष्प व पुष्पमाला अर्पण करून स्टडी फाउंडेशनच्या वतीने मान्यवरांचे व उपस्थित प्रतिनिधींचे स्वागत करण्यात आले. याप्रसंगी किरण पवार यांची विशेष उपस्थिती होती. प्रास्ताविक उद्योजक मिलिंद बागुल तर सूत्रसंचालन प्रा. विलास रामटेके व आभार प्रा. विलास कटारे यांनी व्यक्त केले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# ५० वर्षांनी प्रशासनाला चूक आठवली; विष्णूनगरात मुरूम उत्खननासाठी जमीन मोकळी करण्याचा डाव?

## तलाठ्यांवर खापर फोडून मोठ्या अधिकाऱ्यांना वाचवण्याचा आरोप; ग्रामस्थ संतप्त

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील विष्णूनगर येथील गट क्रमांक १०६ संदर्भातील महसूल अभिलेख प्रकरणाने आता गंभीर वादाचे रूप धारण केले असून, ५०-६० वर्षे सरकारी नोंदीत असलेली जमीन अचानक तांत्रिक चूक' कशी ठरली? असा संतप्त सवाल ग्रामस्थांनी प्रशासनाला केला आहे. अनेक दशकांपासून ७/१२ उताऱ्यावर सरकार' नावाची नोंद कायम असताना, आता ती चूक असल्याचा खुलासा तहसील प्रशासनाने केल्याने नागरिकांमध्ये संशय आणि रोषाचे वातावरण निर्माण झाले आहे.



ग्रामस्थांच्या मते, महसूल विभागात दरवर्षी ऑडिट, पडताळणी आणि तपासण्या होत असताना इतकी मोठी चूक तब्बल अर्धशतक प्रशासनाच्या नजरेतून सुटणे अशक्य आहे. त्यामुळे ही केवळ चूक नसून कुणाच्या तरी फायद्यासाठी आखलेला डाव आहे का? अशी चर्चा गावात रंगू लागली आहे.

दरम्यान, संबंधित डोंगर परिसरात मुरूम उत्खननाच्या हालचाली सुरू असल्याच्या चर्चेमुळे या प्रकरणाला अधिकच संशयाचे वलय प्राप्त झाले आहे. डोंगरातील मुरूम उपसण्यासाठीच सरकारी जमीन खासगी नावावर करण्याचा प्रयत्न सुरू आहे का? असा थेट आरोप ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

**सामान्य माणसाची चूक तात्काळ दिसते; मग प्रशासनाची ५० वर्षांची चूक कुठे लपली होती?**

सामान्य नागरिकांच्या छोट्या चुकीवर महसूल विभाग तात्काळ कारवाई करतो. मग ५० वर्षे सरकारी नोंदीत राहिलेली चूक प्रशासनाला आता अचानक कशी दिसली? हा प्रकार संशयास्पद असून मुरूम उत्खननासाठीच हा सर्व खटाटोप सुरू असल्याचा संशय बळावत आहे, अशी संतप्त प्रतिक्रिया विंचूर येथील शेतकरी एकनाथ नेऊधाले यांनी व्यक्त केली.

तर विष्णूनगर येथील शेतकरी सुहास पायाळ म्हणाले, महसूल विभागातील अधिकारी स्वतःची जबाबदारी झटकण्यासाठी तलाठ्यांवर खापर फोडत आहेत. दरवर्षी ऑडिट होत असताना आता अचानक चूक सापडते, हे कुणाच्या हितासाठी सुरू आहे का? हा खरोखरच अभिलेखातील दोष आहे की डोंगरातील मुरूम उपसण्याचा मार्ग मोकळा करण्याचा प्रयत्न, याची चौकशी झाली पाहिजे.

**तालुक्यातील इतर सरकार' जमिनींचे काय?**

या प्रकरणामुळे निफाड तालुक्यातील इतर सरकार' नावाने असलेल्या जमिनींचाही मुद्दा ऐरणीवर आला आहे. विष्णूनगरमधील नोंद जर चुकीची होती, तर तालुक्यातील इतर सरकारी नोंदीही चुकीच्या आहेत का? पुढे त्या जमिनींवरही खासगी नावे लावली जाणार का? अशी भीती आता ग्रामस्थांमध्ये व्यक्त होत आहे.

विशेष म्हणजे संबंधित डोंगर परिसरात मोठ्या प्रमाणावर झाडे, मंदिरे, तळी आणि नैसर्गिक संपत्ती असल्याने पर्यावरणीय हानीचीही भीती व्यक्त केली जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी जोरदार मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

---

## महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ द्विवार्षिक निवडणूक २०२६ जाहीर जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/जिमाका : मा. भारत निवडणूक आयोगाने त्यांचे पत्र दि. १८ मे २०२६ अन्वये महाराष्ट्र विधान परिषद स्थानिक प्राधिकारी मतदारसंघाच्या द्विवार्षिक निवडणूक २०२६ चा कार्यक्रम जाहीर केला असून, आज सोमवार दि. १८ मे २०२६ पासून जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे.

■ निवडणूक कार्यक्रमानुसार अधिसूचनेची प्रसिद्धी सोमवार दि. २५ मे २०२६ रोजी होणार आहे.

■ नामनिर्देशन पत्र दाखल करण्याची अंतिम तारीख सोमवार दि. १ जून २०२६ आहे.

■ नामनिर्देशन पत्रांची छाननी मंगळवार दि. २ जून २०२६ रोजी करण्यात येणार आहे.

■ उमेदवारी अर्ज माघारी घेण्याची अंतिम तारीख गुरुवार दि. ४ जून २०२६ निश्चित करण्यात आली आहे. मतदान गुरुवार दि. १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे.

■ मतमोजणी सोमवार दि. २२ जून २०२६ रोजी करण्यात येईल.

■ निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख गुरुवार दि. २५ जून २०२६ आहे. जिल्ह्यातील सर्व संबंधितांनी आदर्श आचारसंहितेचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी केले आहे.

---

## लोकमंगल महाविद्यालयाच्या व्याख्यान संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : श्रीराम ग्रामीण संशोधन विकास प्रतिष्ठान संचालित लोकमंगल महाविद्यालय पार्थना फाउंडेशन मोरवंचीचे संस्थापक प्रसादजी माहिती व विष्णू भोसले यांच्या मार्गदर्शना आयोजित करण्यात आले यामध्ये प्रसाद मोहिते यांनी समाजसेवा व त्यामधील तरुणांचा समावेश समाजातील वेगवेगळे प्रश्न यावरती मार्गदर्शन केले त्यानंतर विष्णू भोसले यांनी कृतीशील तरुणाई या शिबिराबद्दल विस्तृत माहिती



दिली व त्या शिबिरे मागील उद्देश त्यात तरुणांचा सहभाग व शिबिरांचा मानसिक शारीरिक आरोग्यावरती होणारा सकारात्मक परिणाम यावर्षी प्रकाश टाकण्यात आला व या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून कृषी धैवतंत्रज्ञान महाविद्यालयाची प्राचार्य प्राध्यापक सागर महाजन सर लाभले व कार्यक्रमाची प्रास्ताविक प्राध्यापक अजित पुरे सर सुदर्शन व आयोजन प्राध्यापक स्वप्निल कदम यांनी केले.

---

## ज्ञानेश्वरी जाधवची पोलिस दलात निवड

निफाड/प्रतिनिधी : निफाड तालुक्यातील सावरगाव येथील भुमीकन्या तसेच सौ. भारती व श्री. शिवाजी रामनाथ जाधव यांची सुकन्या कु. ज्ञानेश्वरी शिवाजी जाधव हिची मिरा-भाईंदर (ठाणे) येथे पोलीस कॉन्स्टेबल ड्रायव्हर पदावर निवड झाली आहे. तिच्या या यशामागे गोविंद घंगाळे, सागर कातकाडे आणि वैभव थेटे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

ज्ञानेश्वरीच्या या उल्लेखनीय यशामुळे तिच्या कुटुंबीयांमध्ये, नातेवाईकांमध्ये तसेच संपूर्ण परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील एका तरुणीने मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर मिळवलेले हे यश इतर मुलींसाठीही प्रेरणादायी ठरत आहे. ज्ञानेश्वरी जाधव हिच्यावर सर्व स्तरांतून अभिनंदनाचा वर्षाव होत असून तिच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.



---

## नेटवर्क ऑफ सोलापूर येथे लैंगिकता शिक्षण व जीवन कौशल्य' विषयावर जनजागृती कार्यक्रम उत्साहात

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : किशोरवयीन मुला-मुलींमध्ये आरोग्य, स्वच्छता आणि सुरक्षित जीवनशैलीबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने नेटवर्क ऑफ सोलापूर बाय पीपल लिव्हिंग विथ एचआयव्ही येथे लैंगिकता शिक्षण व जीवन कौशल्य या विषयावर विशेष मार्गदर्शनपर जनजागृती कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. या उपक्रमाचे आयोजन प्रिसिजन फाउंडेशन आणि फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखेच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.

कार्यक्रमात एचआयव्ही सहजीवन जगणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींना संतुलित आहाराचे महत्त्व, वैयक्तिक स्वच्छतेचे नियम, मासिक पाळीदरम्यान घ्यावयाची योग्य काळजी, बाल शोषण प्रतिबंध, किशोरवयात होणारे शारीरिक, भावनिक व मानसिक बदल तसेच कॅन्सरसारख्या गंभीर आजारांविषयी व एचआयव्ही सहजीवन जगताना घ्यावयाची खबरदारी याविषयी प्राथमिक माहिती देण्यात आली. तज्ज्ञांनी संवादात्मक पद्धतीने मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांना चांगल्या आरोग्य सवयी अंगीकारण्याचे आवाहन केले. उपस्थित विद्यार्थ्यांनी विविध विषयांवर प्रश्न विचारून कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या कार्यक्रमास एन. एस. ओ. पी. प्लसचे प्रकल्प अधिकारी समाधान माळी, प्रकल्प समन्वयक विजय शिंदे, फिल्डवर्कर आरती रेड्डी, रत्नशिल खंडागळे, सांख्यिकी अधिकारी अविनाश कांबळे, शाखाधिकारी सुगतरत्न गायकवाड आदींची प्रमुख उपस्थिती होती.

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे कार्यक्रम अधिकारी वीरेंद्र परदेशी, कम्युनिटी मोबिलायझर सत्यभामा टोणपे, विकी शिवशरण, उर्मिला बनसोडे, संध्या वाघमारे आणि लॅब टेक्निशन प्रीती चौधरी यांनी सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिरातील विषयांवर प्रबोधन केले. यासाठी २% सी एल एच आय व्ही (CL-HIV) उपस्थित होते. मान्यवरांनी सामाजिक आरोग्य जागरूकतेसाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. एचआयव्ही सह जीवन जगणाऱ्या किशोरवयीन मुला-मुलींकरिता सर्वंकष लैंगिकता प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यासाठी प्रिसिजन फाउंडेशनच्या अध्यक्ष डॉ. सुहासिनी शहा, मॅनेजर जनसंपर्क विभाग नितीन फलटणकर, माधव देशपांडे व वैशाली बनसोडे यांचे मार्गदर्शन लाभले.




कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सत्यभामा टोणपे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उर्मिला बनसोडे यांनी मानले. या कार्यक्रमाच्या माध्यमातून उपस्थितांमध्ये लैंगिकता शिक्षण, आरोग्यदायी जीवनशैली आणि आत्मविश्वासपूर्ण व्यक्तिमत्त्व विकासाबाबत सकारात्मक जनजागृती निर्माण झाली. उपस्थितांनी हा उपक्रम अत्यंत माहितीपूर्ण आणि उपयुक्त असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

---

**महापालिकेच्या स्टोअरमधून दिवसाढवळ्या भंगार गायब'!**

# बुलडोझर बाबा अडचणीत; अतिक्रमण अधिकारी जगन्नाथ बनसोडेंसह ५ जणांवर स्क्रॅप चोरीचा गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

महापालिका प्रतिनिधी /सोलापूर : सोलापूर महापालिकेच्या मुख्यालयामागील स्टोअर विभागात सोमवारी अक्षरशः चित्रपटालाही लाजवेल असा प्रकार घडला. अतिक्रमण विभागाकडून जप्त करण्यात आलेले साहित्य आणि भंगार दिवसाढवळ्या वाहनांमधून बाहेर नेले जात असल्याचा गंभीर आरोप शिवसेना (एकनाथ शिंदे गट) गटनेते अमोल शिंदे यांनी करत महापालिकेतील कारभारावरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले. या घटनेमुळे महापालिका वर्तुळात एकच खळबळ उडाली आहे.



महापालिकेच्या स्टोअर विभागात अतिक्रमण कारवाईदरम्यान जप्त केलेले साहित्य तसेच भंगार ठेवण्यात येते. सोमवारी सकाळी एका वाहनातून येथील साहित्य बाहेर नेण्यात आले. विशेष म्हणजे काही वेळाने तेच वाहन पुन्हा स्टोअर विभागात दाखल झाले. यावेळी मोठ्या प्रमाणात साहित्य आणि भंगार वाहनात भरले जात असताना अमोल शिंदे अचानक घटनास्थळी पोहोचले आणि त्यांनी हा प्रकार वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिला.

घटनास्थळी अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, नगर अभियंता सारिका आकुलवार, अविनाश वाघमारे, अतिक्रमण विभागाचे अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांच्यासह पोलीसही दाखल झाले. अमोल शिंदे यांनी अधिकाऱ्यांसमोरच सवालांची सरबत्ती करत, महापालिकेच्या मालमत्तेची अशी खुलेआम लूट सुरू आहे का? असा संतप्त सवाल उपस्थित केला.

> **शिवसेना नेते अमोल शिंदेंचा धडक प्रवेश; अधिकाऱ्यांसमोरच उघड झाला प्रकार, एफआयआरचे आदेश**

यावेळी स्टोअर विभागातील सीसीटीव्ही फुटेज तातडीने तपासून संपूर्ण प्रकाराचा छडा लावावा, अशी मागणी शिंदे यांनी लावून धरली. अखेर अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे यांनीही प्रकार गंभीर असल्याचे मान्य करत संबंधितांवर एफआयआर दाखल करण्याचे स्पष्ट आदेश दिले.

**एफआयआर करा म्हणताच शिंदे संतापले**

घटनास्थळी झालेल्या चर्चेदरम्यान अतिक्रमण विभागाचे अधिकारी जगन्नाथ बनसोडे यांनी, जर काही चुकीचे होत असेल तर लोकप्रतिनिधी म्हणून पोलिसांत एफआयआर करा, असे वक्तव्य केले. हे ऐकताच अमोल शिंदे संतापले. त्यांनी थेट अतिरिक्त आयुक्त कारंजे यांच्याकडे बोट दाखवत, महापालिकेच्या स्टोअरमधून साहित्य बाहेर जात असताना अधिकारीच जबाबदारी झटकत असतील तर नागरिकांनी कुणावर विश्वास ठेवायचा? असा सवाल केला.

यावर कारंजे यांनीदेखील स्टोअर विभागातील कार्यपद्धती चुकीची असल्याचे मान्य करत संबंधित अधिकाऱ्यांविरोधात कारवाई आणि एफआयआरचे आदेश दिले.

---

## अक्कलकोट नगरपरिषदेचा प्रत्येक गुरुवारी 'नो व्हेईकल डे' साठी झाला निर्णय; नगराध्यक्ष व मुख्याधिकारी यांचा संयुक्त निर्णय

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : अक्कलकोट नगरपरिषदेच्या वतीने एक चांगला निर्णय आज घेण्यात आला असून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सुरक्षित भविष्याच्या आणि काटकसरीच्या धोरणांचा आवाहनाचा विचार करून येत्या गुरुवारपासून नगराध्यक्ष, नगरसेवक आणि कर्मचारी यांच्यासाठी प्रत्येक गुरुवारी 'नो व्हेयिकल डे ' पाळण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. ही माहिती अक्कलकोटच्या नगराध्यक्ष मिलन कल्याणशेट्टी यांनी दिली आहे. इंधनाची बचत करणे हा 'नो व्हेयीकल डे ' याचा मुख्य उद्देश असला तरी त्याला अनेक महत्त्वाचे आणि उपयुक्त असे कारणे लागू होतात याचा विचार करून येत्या गुरुवार तारीख २१ मे २०२६ पासून अक्कलकोट नगरपालिकेचे नगराध्यक्ष उपनगराध्यक्ष, सर्व नगरसेवक मुख्याधिकारी आणि नगरपरिषदेचे सर्व अधिकारी आणि कर्मचारी यांच्यासाठी सदर 'नो व्हेईकल डे' चा अंमल लागू होणार असून तो यापुढे प्रत्येक गुरुवारी पाळला जाणार आहे. या निर्णयाचा लाभ जरी मर्यादित क्षेत्रासाठी असला तरी तो दीर्घकालीन असल्याने त्याचे चांगले फायदे येत्या काळात पहावयास मिळणार आहेत. 'नो व्हेईकल डे' चा मुख्य उद्देश हा वायू प्रदूषण कमी होते.एक दिवस वाहनांचा वापर कमी केल्याने पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी होऊन आर्थिक बचत होते, तसेच देशाच्या इंधन साठ्यावर ताण कमी होतो,वाहतूक कोंडी कमी होते.या सर्व कारणासाठी उपयुक्त ठरावा यासाठी अमलात आणण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनाचे सकारात्मक पालन करून एक जागरूक नागरिक म्हणून खारीचा वाटा उचलण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे.

> **अक्कलकोट नगरपरिषदेने घेतलेला 'नो व्हेयिकल डे 'हा दूरगामी परिणाम करणारा महत्त्वाचा निर्णय असून हा केवळ एक दिवस पाळले जाणे यासाठी नसून स्वच्छ पर्यावरण, चांगले आरोग्य आणि सुरक्षित भविष्यासाठी महत्त्वाची सामाजिक चळवळ आहे.शहरवासियांनी दर गुरुवारी या मोहिमेत आपल्या उज्वल भविष्यासाठी शक्य त्यांनी या अडचणीच्या काळात सहभागी होऊन सहकार्य करावे हे आवाहन वजा विनंती आहे.**
>
> **– मिलन कल्याण शेट्टी**
> **नगराध्यक्ष, अक्कलकोट**

# २६ मे रोजी दिल्लीची नाकेबंदी! कांदा दरावरून रोहित पवारांचा केंद्राला थेट इशारा





**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : कांद्याला मिळणाऱ्या मातीमोल दरामुळे संतप्त झालेल्या शेतकऱ्यांच्या भावना आता रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत असून, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी केंद्र सरकारला थेट इशारा दिला आहे. कांद्याला किमान २४ रुपये प्रतिकिलो दर देण्याबाबत आठवडाभरात निर्णय न घेतल्यास २६ मे रोजी मुंबई-आग्रा राष्ट्रीय महामार्गावर दिल्लीकडे जाणारी वाहतूक रोखण्यात येईल, अशी आक्रमक घोषणा त्यांनी केली.

आशिया खंडातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ असलेल्या लासलगाव येथे सोमवारी भेट देत रोहित पवार यांनी शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. यावेळी पदाधिकाऱ्यांनी कांद्याच्या माळा घालून आंदोलनाला पाठिंबा दर्शविला, तर रोहित पवार यांनी कांद्याने भरलेल्या ट्रॅक्टरचे सारथ्य करत आंदोलनाची धार अधिक तीव्र केली.

केंद्र सरकारने दर स्थिरीकरण योजनेंतर्गत कांद्याची खरेदी १२ रुपये ३५ पैसे प्रतिकिलो दराने करण्याची घोषणा केल्यानंतर राज्यभरातून संताप व्यक्त होत आहे. याच पार्श्वभूमीवर रोहित पवार यांनी सरकारला सवाल केला की, निवडणुकीपूर्वी २०२३ मध्ये २४ रुपये दर देणारे सरकार आता खर्च वाढलेला असताना केवळ १२ रुपये कसे देऊ शकते?

शेतकऱ्यांना प्रश्न विचारून त्यांनी सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्लाबोल केला. खतांचे दर वाढले का? मजुरी वाढली का? उत्पादन खर्च लाखाच्या घरात गेला का? असे प्रश्न विचारत त्यांनी उपस्थित शेतकऱ्यांना हात वर करून उत्तर देण्यास सांगितले. तीन ते आठ रुपये किलो दर शेतकऱ्यांना परवडतो का? असा सवाल करताच उपस्थितांमधून तीव्र नाराजी व्यक्त करण्यात आली.

दर कायम असेच राहिल्यास काय कराल? या प्रश्नावर काही शेतकऱ्यांनी आत्महत्या असा संतप्त प्रतिसाद दिला. त्यावर भावनिक होत रोहित पवार म्हणाले, महाराष्ट्रात दररोज सहा ते सात शेतकरी आत्महत्या करत आहेत आणि सरकार मात्र डोळेझाक करत आहे. ट्विटरवर पोस्ट करून शेतकऱ्यांचे पोट भरत नाही; सरकारला ठोस निर्णय घ्यावाच लागेल.

२६ मे रोजी सकाळी मुंबई-आग्रा महामार्गावर रास्तारोको करून दिल्लीकडे जाणारी वाहतूक रोखली जाईल, असा थेट इशारा देत त्यांनी आंदोलन अधिक तीव्र करण्याचे संकेत दिले.

रोहित पवार यांच्या संभाव्य आंदोलनाची माहिती समाजमाध्यमांवर व्हायरल झाल्याने बाजार समिती परिसरात मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. यावेळी खासदार जयदत्त होळकर, दत्ताभाऊ पाटील, माणिकराव शिंदे आदी उपस्थित होते.

# राज्यातील माळी समाजातील नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकाऱ्यांचा सत्कार सोहळा!

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

कळंब तिनिधी/सुधाकर रणदिवे : माळी विकास मिशन आयोजित माळी समाजातील राज्यभरातील स्थानिक स्वराज्य संस्थांमधील (पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका, महानगरपालिका मधील )सर्व नवनिर्वाचित सदस्य आणि पदाधिकारी यांचा सत्कार सोहळा व प्रबोधन शिबिर २०२६ चे उदघाटन ह.भ.प. सावता महाराज वसेकर, आमदार योगेश अण्णा टिळेकर यांचे हस्ते होणार आहे

कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगन भुजबळ, ग्रामविकास मंत्री नामदार श्री. जयकुमार गोरे,बहुजन कल्याण मंत्री नामदार अतुल सावे यांचे शुभहस्ते हा सत्कार सोहळा पार पडणार आहे

यावेळी श्री. महेश झगडे (सेवानिवृत्त खड ),श्री. शेखर गायकवाड (सेवानिवृत्त खड ) यांचे मार्गदर्शन होणार आहे तर यावेळी खा. डॉ. अमोल कोल्हे, मा. आ. उमेश उर्फ चंदू यावलकर,आ. डॉ. प्रज्ञाताई सातव,मा. आ. कपिल पाटील आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत

**मंत्री ना.छगन भुजबळ, ना.जयकुमार गोरे, ना.अतुल सावे यांची उपस्थिती**

रविवार दि.३१ मे २०२६ सकाळी १०:३० ते ५:३० सावित्रीबाई फुले सभागृह, गंज पेठ, पुणे.येथे हा कार्यक्रम पार पडणार आहे

या कार्यक्रमास राज्यातील सर्व माळी समाजातील नगरसेवक, नगराध्य, उप नगराध्यक्ष, महापौर, उपमहापौर, जिल्हा परिषद सदस्य,सभापती, पंचायत समिती सदस्य व सभापती मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन माळी विकास मिशनचे राज्य समन्वयक सर्वश्री संतोष भोजने शिक्षण प्रसार समिती (धाराशिव), सेवानिवृत्त ए सी पी सुरेश जाधव (सातारा मुंबई) के. आर. चौधरी, (मुंबई ) अशोक भुजबळ (तळेगाव, पुणे), राजकीय समिती इंजि. वासुदेव चौधरी, आरोग्य समिती डॉ. श्रीकृष्ण ढोणे (ठाणे), स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन समिती प्रा. अमृतराव काळोखे (सातारा, ) , रोजगार समिती राजेंद्र अहिरे (नाशिक), उद्योजक व कृषी समिती गोविंद डाके (लातूर, पुणे), दक्षता समिती ॲड मिलिंद घोडेकर (नारायणगाव, पुणे), युवा विभाग उमेश महाजन (जळगांव), प्रदेश प्रवक्ते विलास इंगळे (अकोला) , कला व संस्कृती समिती शरद वऱ्हेकर (अमरावती) नामदेव जाधव (धुळे),डॉ अरुणा माळी (कोल्हापूर),शीतल साखरे (गेवराई, बीड) यांनी केले आहे.

# जल जिवन मिशन अंतर्गत लाखो रुपये खर्चूनही कंडारी गावात पाण्यासाठी महिलांची पायपिट



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

शिवाजी खरात यांच्या नेतृत्वात ग्रामस्थांचा २०मे रोजी आमरण उपोषणाचा इशारा

राहुल साबळे / बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या हर घर जल या महत्त्वाकांक्षी घोषणेला सिंदखेडराजा तालुक्यातील कंडारी येथे प्रशासकीय उदासीनता आणि कंत्राटदाराच्या मनमानी कारभारामुळे हरताळ फासला गेला आहे. जल जीवन मिशन अंतर्गत गावात लाखो रुपयांचा निधी खर्च झाल्याचे भासवले जात असले, तरी प्रत्यक्ष परिस्थितीत गावकऱ्यांना पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत आहे. या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याच्या मागणीसाठी सरपंच पती शिवाजी खरात यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थ २० मे पासून आमरण उपोषणाचा इशारा दिला आहे.

कंडारी येथे ग्रामीण पाणी पुरवठा उपविभागांतर्गत झालेल्या या कामामध्ये तांत्रिक निकषांची पायमल्ली झाल्याचे उघडपणे दिसून येत आहे. कंत्राटदाराने पाईपलाईन टाकताना आणि इतर बांधकामे करताना अत्यंत बोगस साहित्याचा वापर केला असून, काम पूर्ण झाल्याचे दाखवून बिलेही लाटली असल्याचे निवेदनात नमुद करण्यात आले आहे.

> **२०मे पासून कंडारी ग्रामस्थांनी पाण्यासाठी होत असलेली पायपिट थांबवण्यासाठी कंडारी येथील मारोती मंदिरासमोर शिवाजी खरात यांच्या नेतृत्वाखाली उपोषण इशारा दिला आहे. गावाणे सरपंच पदाची दिलेली जबाबदारी पार पाडण्यासाठी ग्रामस्थासाठी जोपर्यंत पाणी प्रश्न मिटणार नाही तोपर्यंत उपोषण करतच राहणार**
>
> **– सरपंच पती,**
> **शिवाजी खरात कंडारी तालुका सिंदखेडराजा**

प्रशासकीय अनास्थेच्या चक्रव्यूहात खोडाळ्याचा पाणीपुरवठा; अधिकारी आणि ठेकेदारांच्या टोलवाटोलवीमुळे नागरिक हैराण भर उन्हाळ्यात गावकऱ्यांच्या नळाला पाणी येत नसल्याने महिलांना पिण्याच्या पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे. या संदर्भात ग्रामस्थांनी वेळोवेळी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांकडे दाद मागितली, मात्र त्यांना कोणताही सकारात्मक प्रतिसाद मिळाला नाही. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन शिवाजी खरात यांनी जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, या कामाची पाहणी करून चौकशी करावी

केवळ कागदोपत्री चौकशी न करता प्रत्यक्ष कामाच्या दर्जाची तपासणी होणे गरजेचे आहे. ज्या कंत्राटदाराने शासनाची फसवणूक करून जनतेला तहानलेले ठेवले आहे, त्याचे परवाने तात्काळ रद्द करून त्याला काळ्या यादीत टाकण्यात यावे. जर प्रशासनाने १९ मे पर्यंत या मागणीवर कोणतीही ठोस कारवाई केली नाही, तर २० मे पासून कंडारी येथील मारोती मंदिरासमोर आमरण उपोषण करण्याचा निर्धार शिवाजी खरात यांनी व्यक्त केला आहे. शिवाजी खरात. स्वप्निल शिवाजी कायंदे.विद्याधर घुगे संतोष जायभाये.रमेश कायंदे.मदन कायंदे.प्रद्युमन कायंदे . आत्माराम घुगे.अशोक नागरे.अरून कायंदे .व ग्रामस्थ उपोषणाला बसणार आहेत.

# राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांची दिव्यांग व अनाथ मुलांच्या काष्ठ कलाकृती प्रदर्शनाला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : गतिमंद व अनाथ मुलांचे पालक शंकरबाबा पापळकर यांनी मुंबईत आयोजित केलेल्या काष्ठशिल्प कलाकृतींच्या प्रदर्शनाला राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी भेट दिली व दिव्यांग कलाकारांनी तयार केलेल्या कलाकृतींचे अवलोकन केले. यावेळी राज्यपालांनी काष्ठशिल्प कलाकारांशी संवाद साधला तसेच शंकरबाबा पापळकर यांच्या कार्याचे कौतुक केले. शंकरबाबा पापळकर यांनी यावेळी राज्यपालांना विविध काष्ठशिल्पांच्या वैशिष्ट्यांची माहिती दिली. शंकरबाबा पापळकर तसेच पु. ल. देशपांडे अकादमीच्या संचालिका मीनल जोगळेकर यांनी राज्यपालांचे स्वागत केले. पद्मश्री शंकरबाबा पापळकर यांच्या मार्गदर्शनाखाली स्व. अंबादास पंत वैद्य बेवारस दिव्यांग बालगृह, वझ्झर, जिल्हा अमरावती येथील अनाथ मुलांनी सागवान व बेल आदी लाकडांपासून विविध काष्ठशिल्पे साकारली असून, या कलाकृती विक्रीसाठी ठेवण्यात आल्या आहेत.

यावेळी राज्यपालांचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे, कलादालनाच्या क्युरेटर वर्षा कारळे तसेच छायाचित्रकार शिरीष कारळे उपस्थित होते.

# नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : चंद्रशेखर बावनकुळे हे महाराष्ट्र विधानसभेवर निवडून गेल्याने रिक्त झालेल्या नागपूर स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या महाराष्ट्र विधानपरिषद जागेसाठी भारत निवडणूक आयोगाने पोटनिवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. या जागेचा कार्यकाळ १ जानेवारी २०२८ पर्यंत आहे. या निवडणुकीची अधिसूचना सोमवार, २५ मे २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम मुदत सोमवार, १ जून २०२६ असून, अर्जांची छाननी मंगळवार, २ जून रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख गुरूवार, ४ जून २०२६ आहे. या पोटनिवडणुकीसाठी मतदान गुरूवार, १८ जून २०२६ रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होणार आहे. मतमोजणी सोमवार, २२ जून २०२६ रोजी करण्यात येईल. ही संपूर्ण निवडणूक प्रक्रिया गुरूवार, २५ जून २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे. भारत निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील किमान ७५ टक्के स्थानिक स्वराज्य संस्था कार्यरत असणे तसेच त्यातील ७५ टक्के मतदार अस्तित्वात असणे आवश्यक असते. या निकषांची पूर्तता न झाल्याने संबंधित पोटनिवडणूक आतापर्यंत घेता आली नव्हती. मात्र, आता हे निकष पूर्ण झाल्याची माहिती महाराष्ट्राचे मुख्य निवडणूक अधिकारी यांनी आयोगाला दिल्यानंतर आयोगाने पोटनिवडणूक घेण्याचा निर्णय घेतला आहे. दरम्यान, संबंधित मतदारसंघात आदर्श आचारसंहिता तत्काळ प्रभावाने लागू करण्यात आली असल्याचे भारत निवडणूक आयोगाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

**शहरातील प्रमुख दोन्ही बाजूंवर असणाऱ्या अतिक्रमणधारकांवर झाली कारवाई**

**व्यावसायिकांच्या रोजी रोटीचा प्रश्न ऐरणीवर**

# निफाडमध्ये अतिक्रमणावर हातोडा; वाढती वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी बांधकाम विभागाने केली कारवाई





> **तालुक्याचे ठिकाण असलेल्या निफाड शहरात वाढत्या अतिक्रमणधारकांमुळे वाहतुकीची कोंडी होत होती त्यामुळे शहरात येणाऱ्या नागरिकांना वाहतूक समस्येचा समस्येला सामोरे जावे लागत होते लग्न तिथी व तालुक्याचा आठवडे बाजार असल्यावर ही परिस्थिती अजून चिघळली जात होती त्यामुळे शहरातील वाहतुकीवर ताण येऊ नये व नागरिकांना नागरिकांचा प्रवास सुकर व्हावा यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने आज ही मोहीम राबवण्यात राबवण्यात आली या त कोणालाही हेतु पुरस्कार त्रास देण्याचा उद्देश नव्हता शासकीय नियमाप्रमाणे ही मोहीम सुरू करण्यात आली होती. ज्या ठिकाणी अतिक्रमण काढले आहे त्यांनी परत तेथे अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करू नये केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल**
>
> **– प्रकाश घोडे,**
> **अभियंता निफाड सार्वजनिक बांधकाम विभाग**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील वाढत चाललेल्या अतिक्रमण धारकांवर हातोडा फिरवण्याची मागणी नागरिकांमधून होत होती. वाहतूक व्यवस्थेचा बोजवारा उडत असल्याने नाशिक निफाड चौफुली ते निफाड पंचायत व उगाव त्रिफुलीवर दोन दोन तास वाहतुकीच कोंडी लग्नकार्य व शुक्रवारी शहराचा आठवडे बाजार असल्याने होत होती . नागरिकांच्या अनेक वर्षाच्या मागणीला व विनंतीला ओ देत सार्वजनिक बांधकाम विभाग अभियंता प्रकाश घोडे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार १९ मे रोजी सकाळी दहा वाजेपासून सिन्नर चांदवड महामार्ग व शिर्डी वघई महामार्गावरील नाशिक छत्रपती संभाजी नगर चौफुली ते निफाड पंचायत समिती पर्यंत शहरातील दोन्ही बाजूंवर असणाऱ्या अतिक्रमणधारकांवर जेसीबी सह सार्वजनिक बांधकाम विभाग अधिकारी, कर्मचारी, निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांच्या नेतृत्वाखाली पोलीस फौजफाट्यासह बंदोबस्त घेऊन ही मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने राबवण्यात आली.

या अतिक्रमण मोहिमेत शहरातील अनेक युवक नागरिक महिला यांनी विविध प्रकारचे या दोन्ही मार्गांवर आपली उपजीविकेसाठी दुकाने मांडली होती अनेक वर्षापासून त्यांची दुकाने या ठिकाणी सुरू होती परंतु वाढत्या वाहतुकीची कोंडी होत असल्याने हा निर्णय सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच न्यायालयात निफाड बाजार समितीच्या वतीने याचिका दाखल करण्यात आली होती त्या अनुषंगाने ही मोहीम सार्वजनिक बांधकाम विभागाने राबवली जरी असली तरी यात अनेक लोक बेघर व ज्यांच्या प्रपंच हातावर होता त्यांना आता व्यवसायासाठी नवीन जागा जागा उपलब्ध करावी लागणार आहे यासाठी निफाड नगरपंचायत या निर्वासित झालेल्या व्यावसायिकांना नवीन जागा देणार का हा मोठा प्रश्न या ठिकाणी नागरिक उपस्थित करत होते.